**नवी मुंबई महानगरपालिका**
**प्रसिध्दीकरीता**

**दिनांक :- १६/०२/२०१७**

**जमा व खर्चाचे सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे मूळ अंदाज स्थायी समितीस सादर**

नवी मुंबई महानगरपालिकेचे सन २०१६-१७ वर्षाचे सुधारित व सन २०१७-१८ वर्षाचे मूळ अंदाज महापालिका आयुक्त श्री. तुकाराम मुंढे यांनी आज स्थायी समितीपुढे सादर केले.

सन २०१६-१७ करीता मागील उदिदष्टपूर्ती करणारे आरंभीच्या शिल्लकेसह रु. २२९५.१९ कोटी जमा व अखेरच्या शिल्लकेसह रु. २२९५.१९ कोटी खर्चाचे सुधारित अंदाज सादर करण्यात आले.

तसेच सन २०१६-१७ च्या मूळ अंदाजाच्या तुलनेत सन २०१७-१८ मध्ये रु. ९७५.३७ कोटी एवढया म्हणजेच जवळपास ४८ टक्के वाढीसह, रु. ३५५.६५ कोटी आरंभीच्या शिल्लकेसह रु. २९९९.४७ कोटी जमा व रु. २९९८.४८ कोटी खर्चाचे आणि रु. ९९ लक्ष शिलकेचे नवी मुंबई महानगरपालिकेचे सन २०१७-१८ चे मूळ अंदाज स्थायी समितीसमोर सादर करण्यात आले.

नवी मुंबई महानगरपालिकेचे अंदाज सादर करताना पुढील काही वर्षाचे शहराचे नियोजन व आधारित कामे यांचा विचार करताना विकासाची दिशा, गरजेनुसार आवश्यक प्रकल्प, त्यांची व्यवहार्यता यावर जमा व खर्च यांचा ताळमेळ घालणे आवश्यक असल्याने त्यादृष्टीने विविध स्त्रोतापासून प्राप्त होणाऱ्या जमेचा अंदाज ध्यानात घेऊन महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात येणाऱ्या सेवांसाठीच्या खर्चाचा ताळमेळ योग्यरित्या व प्राधान्यक्रम ठरवून घालणे आवश्यक असल्याचे लक्षात घेण्यात आले आहे.

त्यामुळे उत्पन्नाच्या बाजू निश्चित करताना न्यायसंगत समतोल वितरण आणि वापराप्रमाणे शुल्क आकारणीत सुसूत्रीकरण करणे विचारात घेऊन शहरातील सर्वसामान्य घटकांवर जास्त बोजा न पडता, ज्यांची आर्थिक क्षमता (Paying Capacity) आहे त्यांच्याद्वारे जास्त उत्पन्न प्राप्त होईल यावर भर देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यामध्ये मूळ दर व पुरविण्यात येणाऱ्या सेवा यांचा विचार करुन वापरानुसार दर ठरविण्याचा प्रयत्न आहे. याचा विचार करुन जमेचे अंदाज सादर करण्यात आले आहेत.

दूसरीकडे नवी मुंबई या २१ व्या शतकातील शहराच्या गरजा लक्षात घेऊन खर्चाच्या बाबींचा प्राधान्यक्रम ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये शहरातील जलवाहिन्या, मलनि:स्सारण वाहिन्या, रस्ते, पदपथ अशा नागरी सुविधांची पुर्तता शहरातील काही भागात जास्त तर काही भागात कमी प्रमाणात झाल्याचे दिसून येत असून या असमतोल विकासाकडे कटाक्षाने लक्ष देऊन समतोल विकासावर भर देण्याचा मानस आहे. नवी मुंबई शहर राहण्यासाठी आकर्षक व आर्थिकदृष्टया सक्षम शहर (Liveable and Economically Vibrant) करण्याचा मनोदय आहे.

शहरातील मुले, तरुण, प्रौढ, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच उद्योजक व नोकरदार वर्ग अशा सर्वच घटकांना अपेक्षित असलेल्या योग्य सेवा-सुविधांची दर्जात्मक पूर्तता करण्यासाठी व महानगरपालिकेचे कामकाज ई-गव्हर्नन्सचा प्रभावी वापर करुन, नागरिकांना सुलभ, सोयीचे, पारदर्शक व गतिमान व्हावे याकरीता नवी मुंबई या आधुनिक शहराच्या गरजा व प्राथमिकता लक्षात घेऊन खर्चाच्या बाबींचा प्राधान्यक्रम ठरविण्यात आलेला आहे. तसेच नागरिकांना, व्यावसायिकांना, उद्योजकांना प्रोत्साहक व सुलभ वातावरण (Ease of Doing Business) निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आलेला आहे.

सन २०१७-१८ या वर्षाचे अंदाज सादर करताना नागरिकांच्या संकल्पना, त्यांच्या गरजा, सन्माननिय नगरसेवकांकडून प्राप्त होणाऱ्या नागरी सुविधा कामांच्या शिफारसी, क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून मिळालेली माहिती व विविध क्षेत्रातील तज्ज्ञ यांचा सल्ला अशा सर्व बाबींचा विचार करुन जमा-खर्चाचे अंदाज तयार करण्यात आले आहेत.

## उत्पन्नाच्या बाबी :-

सन २०१७-१८ मध्ये खालीलप्रमाणे उत्पन्नाचे अंदाज धरण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जमेचा तपशील | (रु. कोटीत) |
|---|---|---|
| १. | स्थानिक संस्था कर | १०५०.०० |
| २. | मालमत्ता कर | ८२५.०० |
| ३. | पाणीपट्टी | १३६.९० |
| ४. | नगररचना विकास शुल्क | ११५.०० |
| ५. | परवाना व जाहिरात शुल्क | २५.९८ |
| ६. | अतिक्रमण शुल्क | ५.२० |
| ७. | मोरबे धरण व मलनि:स्सारण | ४.४५ |

| | | |
|---|---|---|
| ८. | रस्ते खोदाई शुल्क | ३५.४५ |
| ९. | महापालिका मालमत्ता शुल्क | ४.१२ |
| १०. | आरोग्य सेवा शुल्क | ६.१६ |
| ११. | केंद्र / राज्य शासन पुरस्कृत योजना | ३३७.१९ |
| १२. | संकीर्ण जमा | ९८.३७ |
| १३. | आरंभीची शिल्लक | ३५५.६५ |
| | **एकूण** | **२९९९.४७** |

उत्पन्नाच्या सर्व बाबी विचारात घेऊन सन २०१७-१८ चे अंदाज वास्तववादी असावे याकडे कटाक्षाने लक्ष देण्यात आले असून, साध्य करता येईल अशा लक्षांकाचा विचार करुन जमा व खर्चाचे अंदाज सादर करण्यात येत आहेत.

**<u>मालमत्ता कर</u> :-**

कोणत्याही अर्थव्यवस्थेमध्ये Tax Buoyancy असेल तरच आर्थिक वृध्दी होऊ शकते. Tax Buoyancy Regime करताना Equitable, Simple, Rational and under tax Base या तत्त्वांवर आधारित असणे अपेक्षित आहे. महापालिकेचा सर्वात महत्वाचा कर स्त्रोत मालमत्ता कर हा आहे व त्यासाठी या सर्व तत्त्वांचा विचार केला गेला पाहिजे.

मालमत्ता कर हा महानगरपालिकेचा सर्वात महत्त्वाचा उत्पन्नाचा मार्ग आहे त्यामुळे त्याच्या उत्पन्नाच्या वाढीकडे प्राथम्याने लक्ष देण्यात येत आहे. या सर्व प्रयत्नांतून महानगरपालिकेचे सन २०१५-१६ या वर्षी झालेले रु. ५१५.७६ कोटी उत्पन्न सन २०१६-१७ या वर्षात रु. ७०५ कोटी होणे अंदाजित आहे. तसेच सन २०१७-१८ या वर्षी रु. ८२५ कोटी होणे अंदाजित धरलेले आहे. म्हणजेच मागच्या वर्षीपेक्षा यावर्षी तब्बल रु. १८९ कोटी रक्कमेची म्हणजेच जवळपास ३७ टक्के वाढ अपेक्षित आहे.

**<u>स्थानिक संस्था कर</u> :-**

आगामी वर्षात स्थानिक संस्था कर विभागामध्ये करांचे दर तेच ठेवून उत्पन्नामध्ये कशा प्रकारे वाढ होईल याचा प्रयत्न करण्यात येत आहे व करवसूलीची योग्यरित्या अंमलबजावणी करुन जास्तीत जास्त उत्पन्न प्राप्त होईल याकडे लक्ष देण्यात येत आहे.

स्थानिक संस्था कर विभागाद्वारे प्रशासन, अंमलबजावणी आणि इतर माध्यमांतून करण्यात आलेल्या सुधारणा लक्षात घेऊन मागील वर्षाच्या रु. ८७० कोटींच्या तुलनेत, सन २०१६-१७ यावर्षी रु. १४० कोटींची वाढ अपेक्षित धरुन एकूण उत्पन्न रु. १०१० कोटी तसेच सन २०१७-१८ यावर्षी रु. १०५० कोटी जमा होईल असा अंदाज आहे.

**<u>नगररचना विकास शुल्क</u> :-**

नवी मुंबई महानगरपालिकेचे एकूण १०८ चौ.कि.मी. क्षेत्रफळ लक्षात घेता व उपलब्ध असलेल्या विकासाच्या मर्यादित संधी लक्षात घेऊन नवी मुंबई या शहरात इमारती/ क्षेत्रांचा पुनर्विकास (Re-Development) व वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक (एफ.एस.आय.) या दोन मार्गांनी महानगरपालिकेस उत्पन्न प्राप्त होऊ शकते. त्यामध्ये घरांची मागणी व उपलब्धता यांचा विचार करावा लागेल. नुकताच सिडकोकडून महानगरपालिकेकडे हस्तांतर झालेला घणसोली नोड हा यामध्ये महत्वाची भूमिका बजावू शकतो. घणसोली नोडमध्ये विकासाच्या बऱ्याच संधी उपलब्ध होऊ शकतात आणि सदरचा नोड नवी मुंबई शहरातील एक उच्च दर्जाचे नागरी क्षेत्र म्हणून उदयास येऊ शकतो. शहरातील व इतर ठिकाणच्या नागरिकांची घरांची मागणी या नोडमधून पूर्ण केली जाऊ शकते.

बांधकामासाठीची पूर्वीच्या कार्यपध्दतीत सुलभता आणण्यासाठी बांधकाम परवानगी, जोते तपासणी व भोगवटा प्रमाणपत्र यासाठीची कागदपत्रे व मान्यतेबाबतची अद्ययावत कार्यपध्दती इत्यादीबाबतची सविस्तर माहिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Permission | Business Process Re-engineering | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Stakeholders Involved | | No of Steps Involved for File Processing | | Documents Required | |
| | | Earlier | After BPR | Earlier | After BPR | Earlier | After BPR |
| 1 | Building Permission (बांधकाम परवानगी) | 10 | 4 | >30 | 6 | 35 | 7 |
| 2 | Plinth Cerfification (जोते तपासणी प्रमाणपत्र) | 10 | 4 | 16 | 6 | 2 | Self Certification |
| 3 | Occupancy Certificate (भोगवटा प्रमाणपत्र) | 8 | 4 | 28 | 6 | 15 | 5 |

अशाप्रकारे प्रयत्न करुन नगररचना विभागाकडून सन २०१७-१८ या वर्षामध्ये रु.११५ कोटी जमा होतील असा अंदाज आहे.

**पाणीपुरवठा :-**

पाणीपुरवठा व्यवस्था ही "Catchment to Consumer" या तत्त्वावर आधारित असणे अपेक्षित आहे. हे करत असताना "ना नफा - ना तोटा" तत्वावर सदरची यंत्रणा चालविण्यासाठी तसेच कमी पाणी वापर करणाऱ्या नागरिकांना त्यांच्या वापराएवढेच दर लावून, जनतेवर जास्त कराचा बोजा न लादता, जो जास्त पाणी वापरेल त्यालाच पाणी वापरानुसार जास्त दर हे टेलिस्कोपिक रेटचे व इक्विटेबल टॅक्सेसचे न्याय तत्व वापरुन पाणीपट्टीची नवी कररचना प्रस्तावित करण्यात आली आहे. यामध्ये "वापरानुसार दर (User Charges)" हे तत्व वापरण्यात आले आहे.

सदर दरांबाबतचा प्रस्ताव तयार करताना शास्त्रोक्त अभ्यास करण्यात आलेला असून सद्यस्थितीतील दरांचे १८ टप्पे कमी करुन फक्त ४ टप्पे ठेवण्यात आले आहेत. याद्वारे पाणी दराची रचना अत्यंत सुटसुटीत करण्यात आली आहे व हे करताना सर्वसामान्य नागरिकांवर करांचा जादा बोजा पडणार नाही याची काळजी घेण्यात आलेली आहे. ज्यामध्ये सर्वात कमी दर हा शहरी गरीब नागरिकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने प्रति १ हजार लिटरला १ रुपया याप्रमाणे प्रस्तावित केला असून प्रति कुटुंब प्रति महिना १० हजार ५०० लिटर पाणीवापर अपेक्षित धरलेला आहे. त्याचप्रमाणे सर्वात जास्त दर २५० ते ३०० लिटर प्रतिदिन प्रतिव्यक्ती पाणी वापरणाऱ्या नागरिकांसाठी प्रस्तावित करण्यात आला आहे.

अशाप्रकारे शहरातील नागरिकांना मुबलक व २४x७ पाणी देण्याचा मानस आहे, त्याकरीता गरिबांवर बोजा न पडता व प्रस्तावित करणेत आलेले पाणी दर गृहीत धरुन सन २०१६-१७ साठी रु. ९३.०१ कोटी इतकी रक्कम जमा होईल असा अंदाज आहे. तसेच सन २०१७-१८ साठी रु. १३९.२४ कोटी इतकी रक्कम जमा होईल असा अंदाज आहे.

अशा विविध बाबींद्वारे सन २०१७-१८ च्या मूळ अंदाजपत्रकात रु. २९९९.४७ कोटी रक्कम जमा होईल असे अपेक्षित धरण्यात आले आहे.

## खर्चाच्या बाबी :-

महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या उत्पन्नातून खर्चाच्या बाबींची प्राथमिकता ठरविताना शहरातील लहान मुले, विद्यार्थी, तरुण वर्ग, प्रौढ, ज्येष्ठ नागरिक, महिला, सर्वसामान्य घटक व मागासवर्गीय घटक अशा सर्व वर्गांना न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

नागरिकांना शहरामध्ये फिरताना कोणत्याही प्रकारचा अडथळा वा अडचण येणार नाही याची काळजी घेऊन अडथळामुक्त रस्ते व पदपथ (Barrier Free Roads and Foothpath), मुलांना-नागरिकांना खेळण्याकरीता मैदाने, विरंगुळ्यासाठी उद्याने, विशेष प्राविण्य प्राप्त करण्यासाठी खेळांची वैशिष्टयपूर्ण मैदाने, चांगल्या शैक्षणिक सुविधांसह उत्तम प्रकारच्या शाळा व मैदाने, आरोग्याच्या गरजा पुरविण्यासाठी रुग्णालये, विभाग कार्यालयांचे आधुनिकीकरण व तरुणांना नोकरीच्या अथवा उद्योगाच्या संधी अशा प्रकारच्या विविध भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी खर्चाचा प्राधान्यक्रम ठरविण्यात आलेला आहे.

सन २०१७-१८ च्या आर्थिक वर्षात पुढीलप्रमाणे मुख्य बाबींवर खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे.

सन २०१७-१८ च्या आर्थिक वर्षातील खर्चाच्या मुख्य बाबी खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | जमेचा तपशील | (रु. कोटीत) |
|---|---|---|
| १. | नागरी सुविधा | ७९७.४६ |
| २. | प्रशासकीय सेवा | ३५६.९० |
| ३. | पाणीपुरवठा व मलनिःस्सारण | ३०८.३६ |
| ४. | इतर नागरी सुविधा (उद्यान, मालमत्ता इ.) | २२९.८० |
| ५. | ई-गव्हर्नन्स | २१७.३७ |
| ६. | सामाजिक विकास | १७१.३५ |
| ७. | स्वच्छ महाराष्ट्र व घनकचरा व्यवस्थापन | १६४.५५ |
| ८. | केंद्र / राज्य शासन पुरस्कृत योजना | १५०.०० |
| ९. | आरोग्य सेवा | १२५.७७ |
| १०. | परिवहन | १२१.०० |
| ११. | आपत्ती निवारण | ९९.३४ |
| १२. | शासकीय कर परतावा | ८६.०० |
| १३. | शिक्षण | ८०.८३ |
| १४. | कर्ज परतावा | ७८.०० |

| | | |
|---|---|---|
| १५. | अतिक्रमण | ११.७५ |
| | **एकूण** | **२९९८.४८** |

| | | |
|---|---|---|
| | अखेरची शिल्लक | ०.९९ |
| | **अखेरच्या शिल्लकेसह एकूण खर्च** | **२९९९.४७** |

**नागरी सेवा (Civic Services) :-**

Walkability - आगामी काळात शहरातील पर्यावरण संरक्षण व संवर्धनाच्या दृष्टीने घरापासून जवळच्या २ ते ३ किमी अंतरावरील मार्केट, शाळा, मैदाने, उद्याने, शॉपिंग कॉम्लेक्स, दवाखाने इ. पर्यंत जाण्यासाठी नागरिकांनी वाहनांचा वापर न करता संभाव्य प्रदूषण टाळून पायी चालत जावे याकरीता अडथळामुक्त रस्ते व पदपथ, विविध मार्गदर्शक नामफलक, सुव्यवस्थित रस्ता क्रॉसिंग सुविधा तसेच सायकलिंग ट्रॅक अशा सुविधा देण्याचा मानस आहे. यामधून नवी मुंबई शहराची Walkability वाढून अडथळा विरहीत शहर आकारास येईल. त्याकरीता रु. २७८.५३ कोटी रक्कमेची भरीव तरतूद करण्यात आली आहे.

घणसोली येथे विभागीय क्रीडा संकुल उभारण्यासाठी १,४५,४५२ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड नवी मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत झाला असून तेथे नवी मुंबईचा सर्वांगीण क्रीडा विकास घडविण्यासाठी क्रीडासंकुल त्वरीत विकसित करण्याचा मानस आहे. त्याकरीता आराखडा तयार करण्यासाठी सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया सुरु असून सन २०१७-१८ या वर्षात रु. १६.५३ कोटी रक्कमेची भरीव तरतूद करण्यात आलेली आहे.

नागरिकांना मुलभूत अभियांत्रिकी सेवा सुविधा देणेसाठी सन २०१७-१८ या वर्षासाठी रु. ७९७.९५ कोटी इतकी भरीव तरतूद केलेली आहे.

**शास्त्रोक्त भूमी भराव पध्दतीवरील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प :-**

"गार्बेज टू गोल्ड" आणि "वेस्ट टू वेल्थ" या संकल्पनेच्या अनुषंगाने महानगरपालिकेमध्ये उपलब्ध असलेल्या कचरा व टाकाऊ पदार्थांपासुन उपयुक्त असे खत किंवा अन्य पदार्थांची निर्मिती करणे किंवा विदयुत निर्मिती प्रकल्प उभारणे यादृष्टीने महानगरपालिका सकारात्मक पावले टाकत असून सी. ॲन्ड डी. प्रकल्प उभारण्यासाठी प्रयत्नशील आहे.

भूमी/ कचरा भराव करीता सन २०१७-१८ या वर्षासाठी रु. २५.७६ कोटी इतकी भरीव तरतूद केलेली आहे.

**पाणीपुरवठा :-**

महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या मोरबे धरणातून शहरातील नागरिकांना २४x७ पाणीपुरवठा करण्याचा मानस आहे. त्यादृष्टीने स्काडा यंत्रणा अद्ययावत करणे, आवश्यक ठिकाणी जलवाहिन्या टाकणे,जलवितरण व्यवस्थेमध्ये DMA बनवून स्काडा यंत्रणेतील उर्वरित बाबींची पूर्तता करणे, मोरबे धरण ते नागरिक या जलवितरण व्यवस्थेतील पाणीपुरवठ्याचा हिशेब अत्याधुनिक यंत्रणेद्वारे मिळविणे याकरीता प्रयत्न करण्यात येत आहेत.

पाणीपुरवठा विभागाकरीता सन २०१७-१८ या वर्षासाठी रु. १९४.८१ कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

**सांडपाणी व्यवस्थापन** :-

शहराला करण्यात येणाऱ्या ३३० द.ल.लि. प्रतिदिन पाणीपुरवठयानंतर २४० द.ल.लि. सांडपाणी प्रक्रिया करण्यासाठी मलप्रक्रिया केंद्रामध्ये आणण्यात येते व त्याठिकाणी SBR (Sequential Batch Reactor) या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रक्रिया होऊन प्रक्रियाकृत पाणी समुद्रात सोडले जाते. या मलप्रक्रिया केंद्रांच्या देखभाल-दुरुस्ती कामांमध्ये सुधारणा करुन ही केंद्रे अत्याधुनिक करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

सांडपाणी व्यवस्थापनासाठी सन २०१७-१८ या वर्षासाठी एकत्रितरित्या रु. १२१.५१ कोटी इतकी भरीव तरतूद ठेवणेत आलेली आहे.

**सार्वजनिक विदयुत व्यवस्था (Street Light /Public Light) :-**

वीजबचतीच्या दृष्टीने सदयस्थितीतील दिवे बदलून एलईडी दिवे लावण्याचा प्रकल्प सार्वजनिक खाजगी सहभागातून (PPP) राबविण्याचा मानस आहे. यामुळे विजेची बचत होणार आहे तसेच खर्चातही बचत होणार आहे आणि वीजसेवेमध्ये सुधारणा होऊन देखभाल-दुरुस्तीच्या खर्चामध्ये बचत होणार आहे. याशिवाय सदर प्रकल्पामधून महानगरपालिकेस काही प्रमाणात उत्पन्नही प्राप्त होणार आहे.

सिडकोकडून घणसोली नोड हस्तांतरित झाल्याने तेथील पथदिव्यांच्या कामाकडे विशेष लक्ष देण्यात येत असून त्यासह महानगरपालिका क्षेत्रात ८२५ नवीन पथदिव्यांचे खांब लावणे प्रस्तावित आहे.

अडथळामुक्त शहर करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या शाळा, रूग्णालये, विभाग कार्यालये या ठिकाणी उद्वाहन लावणे व अंतर्गत विदयुतीकरण सुधारणा करण्यात येत आहेत.

विद्युत विभागाकरीता सन २०१७-१८ या वर्षासाठी रु. ६९.७० कोटी इतकी भरीव तरतूद करणेत आलेली आहे.

**स्मशानभूमी :-**

महानगरपालिका क्षेत्रात १५ मुख्य स्मशानभूमी असून पर्यावरण जपण्याच्या दृष्टीकोनातून लाकडाला पर्याय म्हणून PNG Gas वापराची अत्याधुनिक गॅस शवदाहिनी उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे. याप्रकारे इंधनासाठी वापरण्यात येणारे लाकूड वाचणार असून त्यामुळे वृक्षतोड कमी होऊन पर्यावरण संतुलन राखण्यास मदत होणार आहे. लाकडापेक्षा PNG Gas हा स्वस्त पर्याय असल्याने खर्चातही बचत होणार आहे.

याकरीता सन २०१७-१८ या वर्षासाठी रु. ३८.९६ कोटी इतकी भरीव तरतूद केलेली आहे.

**घनकचरा व्यवस्थापन :-**

घनकचरा व्यवस्थापन हा शहरांच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचा विषय आहे. ज्यामध्ये कचऱ्याचे वर्गीकरण करणे, वर्गीकरण केलेला कचरा साठवणूक करणे, कचऱ्याची वाहतूक करणे, कचऱ्यावर प्रक्रिया करणे व सुरक्षित विल्हेवाट लावणे या बाबींचा समावेश होतो. याचा सर्वकष विचार करुन एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी खालील बाबींवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे.

१) निर्मितीच्याच ठिकाणी कचरा कमी करणे व त्याचा पुनर्वापर करणे.
२) कचरा पुनर्चक्रित करणे (प्लास्टिक, पेपर, धातूच्या वस्तू, काचा, इलेक्ट्रिक व इलेक्ट्रॉनिक्स वस्तू पुनर्वापरात आणणे).
३) ओल्या घरगुती कचऱ्यापासून खतनिर्मिती व गांडूळ खतनिर्मिती करणे
४) कचऱ्यापासून ऊर्जानिर्मिती करणे (RDF जैव मिथेनीकरण करणे, कचरा जाळून टाकण्यासाठी बॉयलर व्यवस्थापन करणे)
५) घनकचरा प्रकल्पस्थळी वर्गीकरण न होणाऱ्या किंवा अविघटीत कोरडया कचऱ्याची भूमीभराव पध्दतीने विल्हेवाट लावणे.

R-4 म्हणजेच Reduce, Recycle, Reuse and Refuse या तत्वांचा वापर करुन प्लास्टिकमुक्तीकडे सकारात्मक वाटचाल करण्यात येईल.

घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता सन २०१७-१८ या वर्षासाठी रु. १४५.२४ कोटी इतकी भरीव तरतूद केलेली आहे.

**स्वच्छ भारत अभियान :-**

स्वच्छ भारत अभियानांतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेने स्वच्छ व सुंदर नवी मुंबई अभियान तसेच प्लास्टिक मुक्त नवी मुंबई अभियान प्रभावीपणे व व्यापक स्तरावर हाती घेण्यात आले आहे.

"स्वच्छ भारत अभियान" अंतर्गत नविन सार्वजनिक शौचालये, सामुदायिक शौचालये व घरगुती शौचालये उभारुन तसेच सदयस्थितीत उपलब्ध असलेली शौचालये दुरुस्त करुन, नवी मुंबई शहर हागणदारीमुक्त (ओ.डी.फ्री) करण्यात आले आहे.

स्वच्छ भारत अभियान प्रभावीपणे राबविणेकरीता सन २०१७-१८ च्या अंदाजामध्ये रु. १९.३१ कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

**उदयान विभाग :-**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील उदयानांचे संवर्धन करणे, पदपथ, कुंपणभिंत, दिवाबत्ती, खेळणी दुरुस्ती करणे अशी कामे विविध विभागांमार्फत वेगवेगळया ठेकेदारांमार्फत करणेत येत होती. सदरची कामे अधिक चांगल्या पध्दतीने व्हावी यासाठी उदयानांचे संवर्धन व दुरुस्ती बाबतची कामे सर्वसमावेशक (Performance Base Comprehensive) ठेका पध्दतीने करण्यात येणार आहेत. याकरीता २१७५.५३ लक्ष इतकी तरतूद करण्यात आली आहे. यामुळे उदयानांचे अधिक चांगले संवर्धन होऊन नागरिकांना दर्जेदार विरंगुळयाची ठिकाणे उपलब्ध करणे शक्य होणार आहे.

नवीन उद्याने विकसित करण्याकरीता व उद्यानांच्या देखभाल दुरुस्तीसाठी सन २०१७-१८ या वर्षासाठी रु. ७७.७५ कोटी इतकी भरीव तरतूद केलेली आहे.

**आरोग्य सेवा :-**

प्राथमिक आणि उच्च आरोग्य सुविधा प्रणाली वृध्दिंगत करण्यासाठी महानगरपालिका कार्यरत आहे. ज्यामध्ये वाशी येथील ३०० बेडस् क्षमतेचे सार्वजनिक रुग्णालय, नेरुळ व ऐरोली येथील १५० बेडस् क्षमतेची रुग्णालये तसेच बेलापूर येथील माता बाल रुग्णालय आणि २२ नागरी आरोग्य केंद्र यांच्यामार्फत आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहेत. आरोग्य सेवेचा दर्जा सुधारणे व त्याचा आवाका (reach) वाढवून सहज उपलब्ध, परवडण्याजोगी, अडथळा विरहित दर्जेदार आरोग्य सेवा सर्व नागरिकांना, विशेषकरुन गरीब व गरजू नागरिकांना पुरविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

आरोग्य विभागाकरीता सन २०१७-१८ या वर्षासाठी रु. १२५.७७ कोटी इतकी भरीव तरतूद केली आहे.

**शिक्षण:-**

शालेय अध्ययन प्रभावी व फलदायी व्हावे तसेच आधुनिक माहिती तंत्रज्ञान युगाशी सुसंगत असावे याकरीता ई-लर्निंगचा प्रकल्प प्रस्तावित केला आहे. ज्यामध्ये व्हर्च्युअल क्लासरुम, स्मार्ट बोर्ड, बिल्डिंग ॲज लर्निंग एड (BALA) आणि शिक्षण प्रशासन या संकल्पनांचा समावेश आहे. यामुळे शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होणार असून शिक्षक व विद्यार्थी यांना अध्ययन प्रक्रियेस पूरक वातावरण सन २०१७-१८ मध्ये कार्यान्वित केले जाईल.

शिक्षण विभागाकरीता गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा ध्यास घेऊन सन २०१७-१८ या वर्षासाठी रु. १३५.७५ कोटी इतकी भरीव तरतूद केलेली आहे.

**etc अपंग शिक्षण, प्रशिक्षण व सेवा सुविधा केंद्र :-**

सर्व प्रकारच्या सर्व वयोगटातील दिव्यांगांना सामावून घेत एकाच छताखाली शिक्षण, प्रशिक्षण व सेवा सुविधा पुरविणारी नवी मुंबई ही देशातील एकमेव महानगरपालिका असून केंद्रामार्फत दरवर्षी साधारणत: ५ हजार लाभार्थी शिक्षण, प्रशिक्षण व सुविधांचा लाभ घेत आहेत.

इ.टी.सी केंद्रातील प्रवेशासाठी असलेली मोठी प्रतिक्षा यादी लक्षात घेता केंद्राची आणखी दोन उपकेंद्रे सुरू करण्यासाठी आगामी आर्थिक वर्षात भरीव तरतूद करण्यात आली आहे.

इ.टी.सी. केंद्रात हायड्रोथेरपी कक्ष स्थापित करण्याचे नियोजन आहे.

० ते ३ वर्ष वय हे बाळाच्या शारीरिक, बौध्दिक, भाषिक विकासाचा महत्वाच्या वयातच बाळाच्या अपंगत्वाचे निदान, उपचार व पुनर्विकास या प्रक्रियांना सुरुवात करण्यासाठी "लवकर निदान व उपचार" हा विभाग इ.टी.सी. केंद्र व आरोग्य विभाग यांचा संयुक्तपणे सुरु करण्याचे नियोजन आहे.

etc केंद्राचे प्रकल्प राबविण्याकरीता सन २०१७-१८ या वर्षासाठी रु. १६.३५ कोटी इतकी तरतूद केलेली आहे.

**क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम :-**

राष्ट्रीय, आंतराष्ट्रीय, विद्यापीठ स्तरावर मान्यताप्राप्त खेळांमध्ये प्राविण्य संपादन करणाऱ्या खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती / आर्थिक सहाय्य करणेकरीता प्रस्तावित आहे. शासनाने निर्देशित केल्यानुसार नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत खेळाडू दत्तक घेऊन कबड्डी, खो-खो व शुटींगबॉल खेळांचे व्यावसायिक संघ तयार करण्याचे प्रस्तावित आहे.

क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम विभागासाठी सन २०१७-१८ या वर्षासाठी रु. ३६.३८ कोटी इतकी भरीव तरतूद केलेली आहे.

**वाहन :-**

वाहन विभागासाठी सन २०१७-१८ या वर्षासाठी रु. १६.१० कोटी इतकी तरतूद केलेली आहे.

**समाज विकास विभाग / महिला व बालकल्याण विभाग :-**

युवकांमधील उद्योजकतेशी संबंधित गुण ओळखून सुयोग्य दृष्टीकोनातून उद्योजक निर्माण करणे याकरीता- कौशल्य विकासनासाठी आवश्यक क्षेत्र निश्चित करणे, सुयोग्य उमेदवार निवडणे, त्यांना प्रशिक्षण देऊन रोजगार निर्मितीसाठी सक्षम बनविणे, त्यांना अर्थसहाय्य अनुदान पुरविणे, बाजारपेठ उपलब्धतेसाठी पाठबळ देणे या गोष्टींचा समावेश आहे. "कौशल्य व उद्योजकता विकास (Skill and entrepreneurship Development)" कार्यक्रम हाती घेण्यात येत असून त्याकरीता रु. ४.६० कोटी एवढी रक्कम प्रस्तावित आहे.

समाज विकास विभाग व महिला बालकल्याण विभागासाठी सन २०१७-१८ या वर्षासाठी रु. ७८.१६ कोटी इतकी भरीव तरतूद केलेली आहे.

## आपत्ती व्यवस्थापन /अग्निशमन :-

केंद्र सरकार आणि UNDP यांच्या सहाय्याने "हवामान धोके व्यवस्थापन प्रकल्प (Climate Risk Mangement Project)" करीता देशातील ७ शहरांमध्ये नवी मुंबई महानगरपालिकेची निवड केली आहे. याकरीता HRVA अंतर्गत आपत्ती व धोक्यांचे परिणाम कमी करण्याकरीता व त्यांचे निवारण करण्याकरीता विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात येत असून टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्स व इंडीयन इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी यांच्यामार्फत अहवाल प्राप्त करुन घेतलेला आहे व पर्यावरणातील बदल जुळवून घेण्याच्या दृष्टीने कृती आराखडे तयार करणेत आलेले आहेत.

आपत्ती व्यवस्थापनाच्या पूर्वनियोजनाकरीता संशोधन अहवालानुसार कार्यवाही करणे प्रस्तावित आहे.

शहर सुरक्षिततेच्या दृष्टीने अग्निशमन विभाग सक्षमीकरण करण्यात येत असून कोपरखैरणे येथे नविन अग्निशमन केंद्र बांधण्याबाबतची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. ऐरोली अग्निशमन केंद्र नवीन स्वरुपात उभारण्यासाठी अभियांत्रिकी विभागामार्फत तरतूद करण्यात आली आहे.

अग्निशमन विभागाच्या आस्थापनेसाठी विविध संवर्गातील पदांना शासन मान्यता प्राप्त झाली असून पदभरती करुन अग्निशमन विभाग सक्षम करण्यात येणार आहे.

आपत्कालीन व्यवस्थापन व अग्निशमन विभागासाठी सन २०१७-१८ या वर्षासाठी रु. ९९.३३ कोटी इतकी भरीव तरतुद केली आहे.

## परिवहन उपक्रम :-

बसेसमुळे होणारे प्रदूषण व कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने कारचा वापर कमी करणे व जास्तीत जास्त बसचा वापर करणे याकरीता परिवहन उपक्रमामध्ये आमुलाग्र बदल करण्यात येत आहेत. आगामी सन २०१७ व १८ या दोन वर्षात JnNRUM च्या उर्वरित व निर्लेखित करावयाच्या बसेसच्या बदल्यात चांगल्या हायटेक बसेस घेऊन वर्षाअखेरीस बसेसच्या संख्या ५०० करण्यात येणार आहे. त्यामध्ये इलेक्ट्रिक बसेस सुध्दा प्रस्तावित आहेत. परिणामी, इतर वाहनांचा वापर कमी होऊन प्रदूषण म्हणजेच कार्बन फूटप्रिंट कमी होण्यास मदत होणार आहे.

केंद्र शासनाने जल वाहतुकीचे महत्त्व विचारात घेऊन जलवाहतुकीस प्रोत्साहन देण्याचे धोरण जाहीर केले आहे. त्या अनुषंगाने बेलापूर ते भाऊचा धक्का (मुंबई) (Ferry Wharf) व बेलापूर ते उरण असे दोन प्रवासी जलवाहतुक मार्ग तांत्रिक दृष्टया शक्य असलेबाबातचा महाराष्ट्र सागरी मंडळ यांचा अहवाल विचारात घेऊन तसेच वरील जलवाहतुक मार्ग नवी मुंबई महानगरपालिके अंतर्गत परिवहन उपक्रमामार्फत सुरु करण्यात येणार आहेत. यामुळे इतर वाहनांचा वापर कमी होऊन प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे.

परिवहन उपक्रम हायटेक करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाच्या धोरणानुसार ITS (Intelligent Transportation System) प्रणालीचा अवलंब करुन PIS (Public Information System), GPRS (General Packet Radio Service), VTS (Vehicle Tracking System), AFCS, Scheduling, Mobile Ticketing, बसेस मध्ये Validator बसवून वाहक विरहित सेवा देणे, स्वाईप मशीन द्वारे पास व तिकीट देणे, उपक्रमातर्फे स्मार्ट कार्ड उपलब्ध करणे तसेच Mobile App या यंत्रणेद्वारे प्रवाशांना बसेसच्या वेळेसंबंधी माहिती उपलब्ध होणार आहे.

Public Transport चा वापर वाढविणे व नागरिकांमध्ये NMT (Non Motorised Transport) याबद्दल जागरुकता वाढविणे व त्यासाठी प्रोत्साहित करणे हा परिवहन उपक्रमाचा उद्देश आहे, जेणेकरुन Carbon Footprint कमी होण्यास मदत होईल.

विविध बाबी प्रत्यक्षात अंमलात आणण्यासाठी परिवहन उपक्रमावर आर्थिक ताण पडण्याची शक्यता लक्षात घेऊन परिवहन उपक्रम अधिक सक्षम करण्यासाठी महानगरपालिकेकडून अनुदानापोटी वाढीव म्हणजेच रु. १२१ कोटी तरतूद करण्यात आलेली आहे.

## ई-गव्हर्नन्स (E-Governance):-

महानगरपालिकेच्या विविध विभागामध्ये संगणकीय प्रणाली व अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन सर्व सेवा आणि त्याबाबतची कार्यालयीन प्रक्रिया ऑनलाईन करण्याचा मानस आहे. यामध्ये मानवी हस्तक्षेप कमीत कमी होईल व सर्व प्रक्रिया नियमानुसार आणि विहित वेळेत पार पाडल्या जातील.

या अनुषंगाने महानगरपालिकेतील सेवा हमी कायदयाअंतर्गत १६ सेवा या ऑनलाईन करण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर इतरही आवश्यक सेवा ऑनलाईन करण्यात येऊन आजतागायत २१ सेवा ऑनलाईन उपलब्ध आहेत व येत्या काही दिवसात ही संख्या ५२ वर नेण्याचा मानस आहे.

ऑनलाईन करभरणा सुविधा देण्यासोबतच ऑनलाईन "तक्रार निवारण प्रणाली (Grievance Redressal System)" विकसित करून कालमर्यादीत व परिणामकारक तक्रार निवारण सुविधा कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रणालीमध्ये मानवी हस्तक्षेपाला जागा नसल्यामुळे ही अत्यंत पारदर्शी व कालमर्यादित परिणामकारक कार्यप्रणाली आहे. या प्रणालीमध्ये आजतागायत २७०० तक्रारी प्राप्त झाल्या असून बहुतांशी तक्रारींचे निराकरण करण्यात आलेले आहे.

Dont ask me to think या तत्त्वावर आधारित ई-गव्हर्नन्स ऑनलाईन सेवा वापरण्यासाठी तीनपेक्षा जास्त Click ची आवश्यकता नसल्याने ही अतिशय सुलभ व वापरण्यास सोपी सेवा आहे.

महानगरपालिकेतील विविध विभागांच्या दैनंदिन कामाकरीता इंटिग्रेटेड एन्टरप्राईस सोल्युशन विकसीत करण्याचे प्रस्तावित असून यामुळे कामकाजाची गती वाढणे, कामकाजात पारदर्शकता येणे, नागरिकांना कमीत कमी क्लीकवर सेवा उपलब्ध करणे, सर्व माहिती कायमस्वरूपी उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांचे LIDAR (Light Detection & Ranging Technology) प्रणाली वापरून ३६०° सर्वेक्षण करणे प्रस्तावित आहे. याव्दारे मालमत्ते संबंधीची पूर्ण माहिती बिनचूक उपलब्ध होईल व याचा उपयोग मालमत्ता कराची आकारणी योग्य पध्दतीने करण्याकरीता होणार आहे.

शहर सुरक्षेच्या दृष्टीने महानगरपालिका क्षेत्रात महत्वाच्या ५३८ ठिकाणी ११०० CCTV कॅमेरे लावण्याचे प्रस्तावित आहे.

ई-गव्हर्नन्स प्रभावीपणे राबविणेकरीता सन २०१७-१८ या वर्षासाठी रु. २१७.३७ कोटी इतकी भरीव तरतूद केलेली आहे.

**<u>नगरसेवक स्वेच्छा निधी व प्रभाग समिती निधी</u> :-**

प्रभागातील विकास कामांकरीता आग्रही असणा-या सन्माननीय नगरसेवकांच्या पाठपुराव्याचा विचार करुन नवी मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात सन २०१७-१८ वर्षाकरीता प्रति नगरसेवक रु. १० लक्ष प्रमाणे नगरसेवक स्वेच्छा निधी व प्रति नगरसेवक रु. ४० लक्ष प्रभाग निधी अशाप्रकारे प्रथमत:च स्वतंत्ररित्या तरतूद करण्यात आलेली आहे. यामुळे मा. नगरसेवकांना प्रभागामधील अत्यावश्यक व गरजेची कामे त्वरीत करणे शक्य होईल, जेणेकरुन मा. नगरसेवक सूचवित असलेल्या कामांविषयी कोणत्याही तक्रारीला वाव राहणार नाही.

मागील वर्षीच्या अंदाजातील अपेक्षित उत्पन्नापेक्षा प्रत्यक्ष प्राप्त झालेल्या उत्पन्नाचा विचार करुन शहरातील प्रत्येक घटकाच्या संकल्पनेतील आधुनिक शहर साकारले जावे यादृष्टीने नागरी सुविधांची पुर्तता करण्याकडे या अंदाजात विशेष लक्ष देण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने आठही विभाग कार्यालयांचे सक्षमीकरण करुन नागरिकांना महापालिकेच्या सेवासुविधांविषयी येणा-या अडचणी विभाग पातळीवरच सोडविल्या जाव्यात व त्यांच्या श्रम, मूल्य व वेळेत बचत व्हावी या भुमिकेतून प्रयत्न करण्यात येत आहे. याकरीता जास्तीत-जास्त सेवा ऑनलाईन उपलब्ध करुन देण्याकडे विशेष लक्ष दिले जात आहे.

महानगरपालिका पुरवित असलेल्या सेवासुविधांचा दर्जा उत्तम राखण्याकडे लक्ष पुरविण्या सोबतच नागरिकांनीही सामाजिक जबाबदारीचे भान राखत शहराविषयी असलेले आपले दायित्व पार पाडावे यामधूनच शहर विकासाला अधिक गतीमानता प्राप्त होईल यादृष्टीने नागरिक सहभागासाठी विशेष प्रयत्न केले जात असल्याचे महापालिका आयुक्त श्री. तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले आहे.

**अतिरिक्त आयुक्त (शहर)**
**नवी मुंबई महानगरपालिका**